| | |
|---|---|
| MHKO140000022025<br><br>QR code is not downloaded due to technical error. | **नियमित दिवाणी दावा क्र.४/२०२५ मधील नि.क्र.५ वरील आदेश.**<br>श्री. आदम नबी नेसरीकर तर्फे वटमुखत्यार,<br>श्री. अस्मल आदम नेसरीकर,<br>**विरूद्ध**<br>श्री. संतोष बुधाजी किरमटे |

**निशाणी क्र.५ वरील आदेश**
(आदेश पारीत दिनांक २९.०१.२०२५)

वादीने प्रस्तुत दावा हा निरंतर मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने या दाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (***यापुढे याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे***) चे क्रम ३९, नियम १ व २ अन्वये दाखल केला असून या अर्जाव्दारे वादी हे प्रतिवादी विरूद्ध त्यांनी दाव्याच्या अंतीम निकालापावेतो वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीला हरकत व अडथळा करू नये तसेच वाद मिळकतीचे कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करू नये अशा आशयाचा तुर्तातूर्त मनाई आदेश मागितलेला आहे. अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादी यांनी त्यांचे शपथपत्र सादर केले आहे. प्रस्तुत आदेश हा वादी यांच्या नि.क्र.५ वरील अर्जावरच असल्याने त्यांनी अर्जात केलेल्या कथनांचा या ठिकाणी पुनुरुल्लेख टाळण्यासाठी पुन्हा उल्लेख करण्यात आलेला नाही.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन</u> :-**

**०२.** जिल्हा परिषद कोल्हापूर तहसिल चंदगड पैकी मौजे चंदगड येथील भु.मा.ग.नं.१६० क्षेत्र ०.३६.४० आर, आकार २ रु. ३१ पैसे (पैकी वादीचे हिस्सेची ० हे. १२.२ आर, आकार ० रु. ७७ पैसे) येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील तदंगभुत वस्तुसह दावा मिळकत होय. सदर दावा अर्जी कलम (१) मधील दावा मिळकत ही सदर वादी यांची वडीलोपार्जीत जमिनीतील १/३ हिश्याची संपुर्ण मालकी वहिवाटीची जमिन मिळकत असून मुळ दावा मिळकत गट नं.१६० मध्ये आजअखेर वादी व त्यांचे भाऊ यांचे दरम्यान वाटप झालेले नाही. असे असताना सदर दावा मिळकत गट नं.१६० मधील ०.हे २४ आर इतके क्षेत्र श्री. युसुफ अब्दुलखादर शेरखान यांनी वादीचे अन्य दोन भावांकडून खरेदी घेतलेचे दाखवून बेकायदेशीरपणे त्यांनी त्याचे नाव गट नं.१६० ला लावून घेतले व त्यानंतर दावा मिळकतीची जमिन देखील वादी यांना खरेदी देवू केली आहे असे दाखवून त्याबाबतचा तसा दावा श्री. युसुफ

अब्दुलखादर शेरखान यांनी दिवाणी न्यायालय क स्तर, चंदगड यांचे समोर दावा मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठी रे.क.न.२६/२००४ हा वादी विरुध्द दाखल केला असून तो आजअखेर प्रलंबित आहे. त्याकामी गट नं.१६० मधील मिळकतीचे हस्तातंर करु नये असा मनाई आदेश देखील झाला आहे. दावा मिळकत गट नं.१६० मधील एकूण क्षेत्रत वादी व त्यांचे भावांचे दरम्यान वाटपच झाले नसलेने एकूण दावा मिळकत गट नं.१६० मधील वादी यांचा १/३ हिस्सा कोणत्या दिशेचा व त्याचे भावांचा हिस्सा कोणत्या दिशेचा हे आजअखेर निश्चीत झालेले नाही. म्हणजेच आजअखेर सदरची संपुर्ण दावा मिळकतीमध्ये वादी यांची सामाईक कब्जे वहिवाट आहे. अशा परिस्थीतीत सदर वादी यांना दावा मिळकतीची सुरक्षितता करणेसाठी एकटयालाच मनाईचा दावा दाखल करणेचा हक्क व अधिकार आहे. वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती असताना यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची जमिन शेत जमिन असताना व तुकडे बंदी कायदयाची बाधा असताना बेकायदेशीरपणे युसुफ शेरखान यांचा मुलगा श्री. शकील युसुफ शेरखान यांचेकडून ०.हे ०२.५६ आर इतके दावा मिळकतीमधील क्षेत्र खरेदी घेतलेचे दाखवून एकूण दावा मिळकतीच्या जमिनीमध्ये पोटहिस्से पाडून स्वतंत्र नकाशा झालेला नसताना अलीकडेच वादींच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करुन त्यामध्ये जबरदस्तीने व बेकायदेशीरपणे वादी यांची कोणतीही संमती नसताना तसेच नगरपंचायत, चंदगड यांचेकडील कोणताही बांधकाम परवाना न घेता दिनांक २३/१२/२०२४ इ. रोजी घर बांधणेसाठी लाईन आऊट टाकून जेसीबीच्या सहाय्याने पाया खुदाई करु लागले. त्यावेळी वादी यांनी त्यांना त्या ठिकाणी दावा मिळकतीचे कायदेशीर वाटप झालेशिवाय बांधकाम करु नये अशी विनंती केली असता प्रतिवादीने दावा मिळकतीवर आपला खोटा हक्क सांगून वादींना वाईट वंगाळ शिवीगाळ केली व पुन्हा दावा मिळकतीत आलेस जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. त्यामुळे वादी यांना सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द कायम मनाईसाठी दाखल करणे भाग पडले आहे. सदर प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे चालू केलेले दावा मिळकतीतील अतिक्रमण व बांधकाम पुर्ण झालेस सदर वादी यांना स्वत:चे दावा मिळकतीस कायम स्वरुपी मुकावे लागणार आहे. परिणामी वादी यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्याच बरोबर याकामी मनाई आदेश झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट योग्य न्याय निवाडा करणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द कायम मनाई आदेश होणे न्यायाचे व गरजेचे आहे. दिनांक २४/१२/२०२४ इ. रोजी घर

बांधणेसाठी लाईन आउट टाकून जेसीबीच्या सहाय्याने पाया खुदाई करु लागले. त्यावेळी वादी यांनी त्यांना त्या ठिकाणी दावा मिळकतीचे कायदेशीर वाटप झालेशिवाय बांधकाम करु नये अशी विनंती केली असता प्रतिवादीने दावा मिळकतीवर आपला खोटा हक्क सांगून वादींना वाईट वंगाळ शिवीगाळ कली व पुन्हा दावा मिळकतीत आलेस जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. तेव्हा दावेस कारण घडले व त्यानंतर रोजचे रोज घडत आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी नि.क्र.१४ वर सादर केलेल्या खुलाश्याव्दारे त्यांनी वादी यांच्या नि.क्र.५ वरील मनाई अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दावा हा कायदेशीरित्या चालणे योग्य नाही. म्हणुन वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा. तसेच वाद जागेचे वर्णन हे वादीने चुकीचे केले आहे. या कारणामुळे देखील वादीचा अर्ज चालणे योग्य नाही. तसेच वादीचे इतर म्हणणे त्यांनी अमान्य केले आहे व कथन केले आहे की, नियमित दिवाणी दावा क्र.२६/२०२४ हा वादी विरुध्द खरेदीखत पुर्ण करावा यासाठी दाखल केला आहे व तो आजदेखील प्रलंबित आहे. तसेच त्यांनी दाव्यातील इतर म्हणणे नाकारले आहे. तसेच वादी हे मनाईचे हुकूमदार आहेत. वाद जागा हाडपण्याचा प्रयत्न करित आहेत. तसेच त्यांनी सदर वाद जागेचे खरेदीखत कसे झाले व त्याचे व्यवहार कसे झाले याबाबत नमुद केले आहे. तसेच या प्रकरणातील वटमुखत्यारपत्रधारक युसूफ नेसरीकर यांनी सदर खरेदीखतावर साक्षीदार म्हणुन सही केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या सदर बाबीद्वारे असे सिध्द होते की, वादी ह्याचे वाद जागेवर कुठलेही हक्क नाही व त्यांनी केवळ वाद जागा हाडपण्याच्या उद्देशाने व प्रतिवादीचे हक्क डावलण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे या सर्व कारणामुळे सदरचा अर्ज हा नामंजुर करण्यात येत आहे.

**०४.** वादी तर्फे श्री. व्ही. बी. कडुकर व प्रतिवादी तर्फे श्री. ए. पी. देवाण यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले. मी, त्यांना खालीलप्रमाणे सकारण निष्कर्ष नोंदविला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी हे मनाई आदेश मिळण्यासाठी सकृतर्शनी दावा त्यांच्या बाजूने आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०२. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने झुकत आहे असे सिद्ध | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | करतात काय ? | |
| ०३. | वादी मनाई आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>वादी तर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रेः–</u>**

**०५.** वादी यांनी दस्ताऐवजाची यादी दाखल करुन विविध गट नं.१६० चे सातबारा उतारा, गट नं.१६० चा ८/अ उतारा, ६९३७ चा फेरफार उतारा या प्रकरणात दाखल केल्या आहेत. तसेच, या प्रकरणातील दावा मिळकतीचे सध्दस्थिती दर्शविणारे छायाचित्र व फोटोचे बील (अ,ब,क,ड) देखील दाखल केले. तसेच, प्रतिवादी यांनी देखील दस्ताऐवजाची यादी दाखल करुन या प्रकरणातील छायाचित्र तसेच, विविध उतारे दाखल केले आहेत व वटमुखत्यार देखील दाखल केले आहे.

:: **<u>का र ण मी मां सा</u>** ::

**<u>मुद्दा क्र. ०१ ते ३ बाबत</u> :–**
**(मुद्दा क्र. ०१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे सदर मुद्दे हे एकत्रितपणे विचारात घेण्यात आले.)**

**०६.** सदर दावा हा मनाई हुकूमाकरिता दाखल करण्यात आला आहे. सदर दाव्यात वादी यांनी स्वत: मान्य केले आहे की, प्रतिवादी यांचे देखील वाद जागेत हक्क आहे व इतर वाद जागा ही एकत्र कुटूंब मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. तसेच प्रतिवादी हे वाद जागेत बेकायदेशीररित्या बांधकाम करित आहे. त्यामुळे सदरचा दावा दाखल करण्यास वादीस भाग पाडले. वादींनी या प्रकरणात दस्ताऐवज दाखल केले परंतु, त्यांनी मान्य केले की हे प्रतिवादी देखील वाद जागेची हिस्सेदार आहेत तसेच, आज देखील वाद जागेचे वाटप झालेले नाही. तसेच वादींनी कथन केले कि, आजदेखील कुठला हिस्सा वादीकडे यायला पाहिले व कठला हिस्सा प्रतिवादीकडे यायला पाहिले हे स्पष्ट झालेले नाही. तसेच दाव्याचे कारण तारीख ही २४/१२/२०२४ ही दाखविण्यात आली आहे. त्यामुळे इतक्या दिवसानंतर वादीने दावा का दाखल केला याचे कुठलेही कारण वादीने दाव्यात नमुद केलेले नाही. त्यामुळे या सर्व

बाबींमुळे वादीस तातडीची अंतरिम आदेशाची गरज आहे असे दिसून येत नाही. तसेच या प्रकरणातील वटमुखत्यारपत्रधारक युसूफ नेसरीकर ह्याचे स्वतःची सही ही वादींनी केलेले खरेदीखतावरुन दिसून येत आहे. तसेच त्यांचे वादींविरुध्द सदर वाद जागेबद्दल एक दावा प्रलंबित आहे व त्यांनी तो नाकारलेला नाही. तसेच वादीचे वाद जागेचे वाटप झाले नसताना देखील त्यांचे संपुर्ण हक्क वाद जागेत आहे हे दिसून येत नाही. तसेच वादींनी दाखल केलेल्या दस्तामध्ये प्रतिवादी यांचा देखील हिस्सा दिसून येत आहे. तसेच युसूफ शेरखान ह्याचे देखील नाव दिसून येत आहे त्यामुळे त्या सर्व कारणामुळे वादी ह्याचे वाद जागेत हिस्सा आहे व वाद जागेत हक्क आहे. असे वादी सिध्द करु शकले नाही व या सर्व कारणामुळे वादीचा दावा हा संशयास्पद दिसून येत आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थीतीत किंवा वादी हा वाद जागेत त्याचा हक्क सिध्द करु शकत नाही व त्याउलट प्रतिवादींनी खरेदीखत व इतर तत्सम दस्ताऐवज दाखल करुन हे सिध्द केले की, वादी ह्याचे कुठल्याही प्रकारे वाद जागेत हक्क नाही व वादी ह्यांच्या हिस्यातील जागा ही खरेदीखताद्वारे विक्रीस काढली आहे व त्यामुळे दिवाणी दावा देखील प्रलंबित आहे. हे सर्व बाबी वादींनी कुठेही नाकारले नाही व केवळ कुठल्याही पुरावा नसताना सदर दावा दाखल केल्याचे दिसून येत आहे. म्हणुन वादी हे या प्रकरणात अंतरिम आदेशासाठी व तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या आदेशासाठी पुर्ण दावा सिध्द झाल्याशिवाय हा अर्ज मंजुर होवून मिळावा म्हणुन पात्र नाही. म्हणुन या सर्व कारणामुळे मी **मुद्दे क्र.१ ते ३** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे व **मुद्दा क्र.४** चे उत्तरासाठी खालील आदेश पारित करित आहे.

**:: आदेश ::**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by VIKRAM SATISH AGARWAL
Date: 2025.01.31 17:37:32 +0530

**ठिकाण : चंदगड**
**दिनांक :२९/०१/२०२५.**

**( व्ही.एस.अग्रवाल )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चंदगड.**